| VOL- IX | ISSUE- IX | SEPTEMBER | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# परिवर्तनवादी चळवळींच्या विशेष संदर्भात गेल ऑम्वेट यांच्या लेखनातील दृष्टीकोन

**डॉ. प्रविण बोरकर,**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, रामचंद किमतराम तलरेजा कॉलेज, उल्हासनगर,
मुंबई विद्यापीठाशी संलग्नित, महाराष्ट्र.
इमेल- drpravinborkar.rkt@gmail.com

गेल ऑम्वेट प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ, इतिहासाच्या भाष्यकार व परिवर्तनवादी चळवळीच्या वैचारिक नेतृत्त्व तसेच दलित, बहुजन व स्त्रीवादावर अधिकारवाणीने लिहिणाऱ्या कृतीशील विचारवंत होत्या. त्यांचा जन्म २ ऑगस्ट १९४१ रोजी अमेरिकेतील ‘मिनेपोलिस’ येथे झाला. त्यांचे पदवी पर्यंतचे शिक्षण मिनेपोलीस येथील कार्लटन कॉलेजमध्ये झाले. पुढे त्यांनी अमेरिकेतील बर्कले कॅलिफोर्निया विद्यापीठातून समाजशास्त्रात एम. ए. केले. विद्यापीठातील विद्यार्थी चळवळीतील तीव्र संघर्षाचा काळ अनुभवून त्या १९६३ मध्ये सर्वप्रथम भारतात आल्या. भारतातील डाव्या नेत्यांना भेटण्यास शिवाय भारतात पूर्वापार अस्पृश्य ठरवलेल्यांच्या लढ्याची माहिती जाणून घेण्यास त्या उत्सुक होत्या.[१] इथे आल्यानंतर त्यांनी चळवळींच्या अभ्यासाला सुरुवात केली; अभ्यास करत असतांना महात्मा फुले यांची सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेतर चळवळ व सांस्कृतिक संघर्षावरील चळवळींनी लक्ष वेधून घेतल्याने त्यांनी या चळवळींचा अभ्यास केला. १९७० च्या दशकात त्यांचा संबंध ‘लाल निशाण पक्ष’, जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या ‘इंदुताई पाटणकर’ व अनेकांशी आला. त्यांनी पीएच.डी. साठी ‘महाराष्ट्रातील ब्राह्मणी वर्चस्वाला आणि जातीव्यवस्थेला आव्हान देणारी शेतकऱ्यांची चळवळ’ हा विषय घेतला, या विषयावर सखोल अध्ययन करून त्यांनी बर्कले कॅलिफोर्निया विद्यापीठास आपला संशोधन प्रबंध सादर केला व १९७३ मध्ये डॉक्टरेट पदवी संपादन केली. पुढे हेच संशोधन त्यांनी ‘वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड आणि पश्चिम भारतातील अब्राह्मणी चळवळ’ (कल्चरल रिव्होल्ट इन कलोनीयल सोसायटी: नॉन ब्राह्मीन मूव्हमेंट इन वेस्टर्न इंडिया) या नावाने प्रकाशित केले. त्यांचे हे पुस्तक भारताच्या सामाजिक इतिहासात मोलाची भर घालणार दस्तऐवज ठरले. गेलच्या पूर्वी भारतातील डॉ. आंबेडकर आणि शाहू महाराज वगळता कोणीही जोतिबा फुले यांच्या चळवळीवर इतका सविस्तर अभ्यास करून, सैद्धांतिक मांडणी केलेली नव्हती. प्रबंधावरील प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या त्या पुस्तकामुळे फुले यांची चळवळ पुन्हा नव्याने अधोरेखित झाली.[२]

दलित वंचितांप्रति असलेल्या आपुलकीतून इंदुताई पाटणकर व त्यांचे पुत्र भारत पाटणकर यांच्याशी त्यांचे घनिष्ठ संबंध निर्माण झाले होते, इंदुताई व भारत पाटणकरांनी गेलला तिच्या संशोधन कार्यातही मदत केली होती. १९७८ मध्ये गेल व डॉ. भारत पाटणकर हे विवाहबद्ध झालेत. गेल आता भारतात राहू लागल्या होत्या, १९८३ मध्ये त्यांनी भारताचे नागरिकत्त्व स्वीकारले व त्या कायमच्या भारतीय झाल्या. गेल या महात्मा फुले, आंबेडकरवाद, मार्क्सवाद तसेच डाव्या पुरोगामी चळवळी, बौद्ध धम्म व स्त्रीवादाच्या अभ्यासक होत्या. त्यांनी नवी दिल्ली येथील ‘नेहरू मेमोरियल म्युझियम आणि ग्रंथालय’, ‘सावित्रीबाई फुले पुणे

विद्यापीठ', पुणे, 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ अॅडव्हान्स्ड स्टडीज', शिमला, 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क अँड सोशल सायन्सेस', भुवनेश्वर, 'इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ', दिल्ली व 'नार्डिक इन्स्टिट्यूट ऑफ एशियन स्टडीज', कोपनहेगन अशा प्रतिष्ठित संस्थांमध्ये काम केले. तसेच 'इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली', 'डाऊन टू अर्थ' इत्यादी नियतकालिके तसेच 'द हिंदू', इंडियन एक्सप्रेस' यात सातत्याने लेखन केले. शिवाय देश-विदेशात अनेक भाषणेही दिलीत. 'श्रमिक मुक्ती दल', 'शेतकरी महिला आघाडी' व 'स्त्रीमुक्ती आंदोलन संघर्ष समिती' या संघटनाच्या स्थापनेत गेल यांचे योगदान होते. त्या आपल्या संयुक्त कुटुंबासह महाराष्ट्राच्या सांगली जिल्ह्यातील 'कासेगाव' येथे अखेरपर्यंत वास्तव्यास होत्या. २५ ऑगस्ट २०२१ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

गेल यांची खरी संपत्ती म्हणजे त्यांचे लिखाण होय. त्यांनी विपुल लेखन केले, त्यांनी इथल्या दुर्लक्षित विषयांवर इंग्रजी भाषेतून लिखाण केले, त्या मूलगामी संशोधक असल्याने त्यांच्या पुस्तकांना सर्वदूर मोठी प्रसिद्धी मिळाली शिवाय संदर्भग्रंथ म्हणून मान्यताही मिळाली. त्यांनी 1. Dalit and the Democratic Revolution : Dr. Ambedkar and the Dalit Moment in Colonial India, 2. Ambedkar towards and enlightened India, 3. Cultural revolt in colonial society : the Non Brahmin Movement in Western India, 4. Seeking begampura, 5. Buddhism in India : Challenging Brahminism and Cast 6. We Will Smash this Prison : Indian Women in Struggle, 7. Songs of Tukoba, 8. Rein venting Revolution : New Social Movement and Socialist Traditions in India, 9. Understanding Cast : from Buddha to Ambedkar and Beyond, 10. Dalit Drishti इत्यादी प्रमुख पुस्तके लिहिलीत, त्यांच्या बहुतांश पुस्तकांचे हिंदी व मराठीत सुद्धा अनुवाद झालेले आहे. या चतुरस्त्र लेखनातून त्यांनी समाजशास्त्रीय चर्चाविश्वात जातीचा प्रश्न अग्रभागी आणला. यातूनच त्यांनी ब्राह्मणी पितृसत्तेची अभ्यासपूर्ण मांडणी केली.[3] गेल यांच्याकडे प्रामुख्याने समाजशास्त्रज्ञ म्हणून बघितले जाते असे असले तरी गेल यांनी भारतातील ऐतिहासिक चळवळींचा लेखाजोखा मांडल्याने त्यांच्या लेखनातून महत्वपूर्ण अशा ऐतिहासिक घटनांची चर्चा असल्याने त्यांचे लेखन इतिहासासाठी तद्वतच परिवर्तनवादी चळवळीसाठी विशेष महत्त्वाचे ठरते.

'बेगमपुराच्या शोधात' हे गेलचे एक महत्त्वाचे पुस्तक होय, यात आधुनिक कालखंडाच्या सुरुवातीच्या पाच शतकांतील आघाडीच्या जातीविरोधी विचारवंताच्या सामाजिक-आर्थिक दृष्टीकोनाचा अभ्यास असून या विचारवंतांनी कशाप्रकारचा आदर्श समाज कल्पिला होता याची चर्चा आहे. भक्ती पंथातील संत रविदास यांनी पहिल्यांदा आदर्श समाजाची कल्पना मांडली होती. संत रविदासाच्या गीतातील बेगमपुरा हे एक 'दु:खविरहीत शहर' असून ते देऊळ विरहीत, जातीविहीन, वर्गविहीन आधुनिक शहर आहे, गांधींच्या आदर्श रामराज्याच्या कल्पनेला छेद देणारी ही मांडणी होती.[4] बेगमपुरात कसलेही कर नाहीत, शारीरिक शोषण नाही की कुणाचा छळ नाही, इथे सर्व लोक समान आहेत. प्राच्यविद्या अभ्यासक, राष्ट्रवादी आणि हिंदुत्ववादी अशा सर्वांच्या प्रेरणा नाकारत गेल यांनी पाच शतकाच्या कालखंडातील दडपलेल्या समाजातील दृष्टया विचारवंतांच्या भूमिकेला एका जागतिक दृष्टिकोनाच्या परिप्रेक्ष्यात गुंफले आहे. हे द्रष्टे विचारवंत आहेत चोखामेळा, जनाबाई, कबीर, रविदास तुकाराम, कर्ताभज, फुले, इयोथी थास, पंडिता रमाबाई पेरियार आणि आंबेडकर. गांधींचा आदर्श खेडे हा रामराज्याच्या कल्पितादर्श, नेहरूंचा हिंदुत्ववादी किनार असलेला ब्राह्मणी समाजवाद आणि सावरकरांचा पारंपारिक भूप्रादेशिक हिंदू राष्ट्रवाद या सर्व कल्पितादर्शांना या विचारवंतांचे दृष्टिकोन छेद देतात त्याचा प्रतिवाद करून मांडणी करतात. प्रमोद मुजुमदार यांच्या मते, "गेल

ऑम्वेट त्यांचे सर्वात महत्त्वाचे कार्य कोणते असेल तर त्यांनी समाजशास्त्र आणि मानव वंश शास्त्राच्या जागतिक विचार विश्वात भारतातील पाचशे वर्षाच्या विद्रोही विचार प्रवाहाचे महत्त्व स्थापित केले."[५]

'दलित आणि प्रजातंत्रिक क्रांती : वसाहतिक भारतात डॉ. आंबेडकर आणि दलित चळवळ' या पुस्तकात एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापासून ते १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मृत्यूपर्यंतच्या दलित चळवळीचा इतिहास वर्णन केलेला आहे. गेल यांनी आंध्र प्रदेश महाराष्ट्र आणि कर्नाटक यांना केंद्रस्थानी ठेवून दलित चळवळीची विचारधारा त्याचप्रमाणे गांधी आणि गांधीवाद व शेतकरी आणि कामगारांचा प्रश्न घेऊन लढणारा मार्क्सवाद या दोन्ही वादांसोबत दलित चळवळीच्या आंतरक्रियेचे विश्लेषण केले आहे. सोबतच जातीची उत्पत्ती आणि विकासाचे ऐतिहासिक दृष्टिकोनातून परीक्षण केलेले आहे. गेलने दलित चळवळीला विस्तृत जातीविरोधी चळवळीचा एक भाग मानले आहे जो भारतीय समाजात लोकतांत्रिक आंदोलनाच्या स्वरूपाचा दिसून येतो. या संपूर्ण प्रक्रियेत हिंदू राष्ट्रवादाला आव्हान देत दलितांनी भारतीय सामाजिक व्यवस्थेची मूळ संरचना बदलण्याचा जो प्रयत्न केला त्याला गेल यांनी अधोरेखित केलेले आहे. त्या लिहितात "या चळवळींचे जाती आणि त्यासोबत असलेले सामाजिक दमन, आर्थिक शोषण व राजकीय प्रभुत्व नष्ट करून त्याऐवजी समतावादी समाजाची निर्मिती करणे हे लक्ष्य होते."[६]

भारतात जाती व्यवस्था हे कटू सत्य आहे या व्यवस्थेने भारतात सामाजिक विषमता निर्माण केली असून बहुसंख्य लोक जातीच्या शोषणाचे बळी ठरले आहेत त्यामुळे वसाहतिक काळात खालच्या जातींमध्ये जागृती निर्माण होऊन त्यांनी जातीव्यवस्थेच्या अंताचा लढा उभारला यात प्रामुख्याने महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर, ई. वी. पेरियार रामासामी या प्रमुख नेत्यांबरोबर नारायण गुरु, अच्युतानंद आणि मंगूराम यांनी जातीच्या शोषण व्यवस्थेवर प्रहार केलेत. गेल यांनी या जाती अंताच्या चळवळीकडे फार गंभीरपणे बघितले असून त्याचे सूक्ष्म विश्लेषण केलेले आहे. भारतात वसाहतीत काळात दलित चळवळी राष्ट्रवाद व मार्क्सवाद हे एकाच वेळेस उदयास आले असून त्यांचा परस्परांवर मोठा प्रभाव पडल्याचे दिसून येते. राष्ट्रवाद जो आजच्या काळात हिंदुत्ववादात रूपांतरित झाला असून त्याचा जनसामान्यांवर मोठा प्रभाव दिसून येतो तर विसाव्या शतकात मार्क्सवाद मोठ्या प्रमाणात प्रचलित असल्याचे दिसून येते या पार्श्वभूमीवर गेल दलित व जातीविरोधी चळवळींना केवळ लक्ष विचलित करणारे आंदोलन असे संबोधत तत्कालीन वर्गवादी मार्क्सवाद व काँग्रेसचा पक्षीय राष्ट्रवाद या दोघांमध्ये संघर्षरत असल्याचे सांगते. शिवाय दलित चळवळीचे विश्लेषण मार्क्सवाद व काँग्रेसचा राष्ट्रवाद यांच्या अभिव्यक्तींनी प्रभावित असल्याचे नमूद करते.[७]

भारतात अकादमीक क्षेत्रात जातीव्यवस्था, तिची निर्मिती, तिचे स्वरूप यांना समजून घेण्याचे मोठे प्रयत्न झाले असून त्या अनुषंगाने विपुल लिखाणही झाल्याचे दिसते. परंतु या क्षेत्रात काम करणाऱ्या बहुसंख्य विद्वानांनी जातीविरोधी आंदोलनांना यातून मात्र वगळल्याचे दिसून येते. जाती व्यवस्थेची दुसरी बाजू ऐकून घेण्यास हे विद्वान तयार नव्हते व नाहीत. शिवाय जातीविरोधी आंदोलनांना अलीकडच्या काळात दूषित पूर्वग्रहातून बघण्याची प्रथा निर्माण झालेली आहे. मार्क्सवादी चळवळींनी तर वर्गांना केंद्रीभूत मानत आपली सर्व शक्ती त्यावर एकवटली व लिखाण सुद्धा त्याच पद्धतीचे केले. बराच काळपर्यंत त्यांनी जातीच्या प्रश्नाला प्रश्न किंवा समस्या म्हणून बघितले नाही. या परिप्रेक्षात गेल लिहितात, "दलित चळवळींना व विशेषतः जाती चळवळींना सामान्यपणे मुल्यासंबंधी अथवा व्यवस्थाविरोधी आंदोलनाच्या रूपात बघितले पाहिजे, परंतु हा तर्क स्वीकारण्यात आला नाही... त्यामुळे आपल्या तर्काला स्थापित करण्यासाठी नवीन पद्धत निर्माण करण्याची गरज आहे ज्याद्वारे वसाहतिक शासन आणि वर्तमानातील सर्व सामाजिक आंदोलनांचे

विश्लेषण करता येईल."[८] एकूणच बघता अशा प्रकारच्या नव्या विश्लेषण पद्धतीची गरज प्रकर्षाने जाणवते. स्वतः गेल यांनी अशी नवीन पद्धत वापरली असून त्याद्वारे त्यांनी ऐतिहासिक घटनांवर भाष्य केले आहे. याच पद्धतीला 'फुले आंबेडकरी विश्लेषण पद्धत' असेही म्हटले जाते. रावसाहेब कसबे, कॉम्रेड शरद पाटील अशा महत्त्वपूर्ण लेखक विचारवंतांनी या पद्धतीचा अवलंब केलेला दिसतो. कॉम्रेड शरद पाटील यांनी तर 'मार्क्सवाद फुले आंबेडकरवाद' (माफुआ) अशी नवीन विश्लेषण पद्धतच मांडली.

भारतात वसाहतिक काळात तथाकथित राष्ट्रवाद निर्माण होऊन ब्रिटिशांच्या विरोधात संघर्ष व आंदोलन झालेत अशा प्रकारच्या आंदोलनाचे नेतृत्व उच्चवर्णीयांच्या हातात होते. फुलांनी तर स्पष्टपणे काँग्रेसला उच्चवर्णीयांची संघटना असे संबोधले होते. सर्व जाती समूहांनी या आंदोलनात सहभागी व्हावे असेही आवाहन करण्यात आले, परंतु भारतातील अभिजनांचे गुलाम असलेल्यांना ब्रिटिशांपेक्षा अभिजन अधिक शत्रूवत वाटत असत त्यामुळेच आम्ही ब्रिटिशांच्या गुलामांचे गुलाम आहोत म्हणून अभिजनांनी लादलेली हजारो वर्षांची गुलामी आधी नष्ट व्हावी. शिवाय सामाजिक विषमता कायम ठेवून एक चांगले राष्ट्र निर्माण होऊ शकत नाही त्यामुळे सामाजिक विषमता नष्ट होणे ही त्यांची पूर्वअट होती तर आधी देशाला स्वातंत्र्य मिळू द्या नंतर सामाजिक सुधारणा होत राहतील असे अभिजनांचे म्हणणे होते. गेल यांच्या मते "दलित तसेच अन्य परिवर्तनवादी जातीविरोधी चळवळी भारतातील लोकशाही क्रांतीचे निर्णायक आवाज होते या चळवळी समग्र रूपाने लोकशाहीवादी होत्या व अंतिमतः राष्ट्रवादी होत्या."[९]

'जातीची समझ : महात्मा बुद्ध ते बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्यानंतर' हे गेल ऑम्वेट यांचे महत्त्वाचे पुस्तक असून यात हिंदुवाद व त्याला आव्हान देणाऱ्या व्यक्ती व विचारांची चर्चा केलेली आहे. जातीची समझ, जाती आणि जातीविरोधी आंदोलनाचे ऐतिहासिक महत्त्व या मुद्द्यांचे विशिष्ट विद्वत्तेसह सखोल निरीक्षणही त्यांनी केलेले आहे. पुस्तकात भारतीय परंपरेला हिंदूवादा समान आणि हिंदूवादाला ब्राह्मणवादासमान समजून वेदांना भारतीय संस्कृतीचा आधार ग्रंथ मानतात आणि भारतीय संस्कृतीचे सार आर्यांच्या वारशामध्ये शोधतात त्यावर टीका करण्यात आली आहे. गेलच्या मते "हिंदूवादाचे दोन्ही विरोधी स्वरूप धर्मनिरपेक्षतावाद आणि हिंदू सुधारवाद जे नेहरूवादी आणि गांधीवादी परंपरांची देणगी आहे. यावर कुठलीही शंका नाही की खऱ्या अर्थाने हिंदू वादाच्या उग्र राजकारणाचा विरोध करण्याचा जे प्रयत्न करत आहेत त्यांचेही हे मानणे आहे की, हिंदू होणे म्हणजेच भारतीय असणे होय तसेच हिंदू धर्म हाच भारताचा पारंपारिक धर्म आहे हे अतिशय आपत्तीजनक आहे."[१०] यावरून धर्मनिरपेक्ष लोक देखील कशाप्रकारे ब्राह्मणवादी तत्त्वज्ञानाच्या पिंजऱ्यात कैद असतात हे स्पष्ट होते. भारतीयत्वाची ओळख फक्त हिंदू धर्माशी निगडित नसून ती विस्तृत आहे हे लेखिकेला विशद करायचे आहे.

या पार्श्वभूमीवर एका पर्यायी परंपरेवर दृष्टीक्षेप टाकण्यात आला असून ही परंपरा दलित, खालच्या जाती व ब्राह्मणेतरांमुळे निर्माण झालेली असून [११] ती भारतीय समाज आणि इतिहासाला परंपरागत पद्धतीने बघण्यावर प्रश्न निर्माण करते. या परंपरेत बुद्ध, चार्वाक, महावीर कबीर, गुरुनानक व बसवण्णाचा विचार दिसतो. या परंपरेने शिवाजी सारख्या नायकावर आपला हक्क सांगितला परंतु शिवाजीच्या हिंदूवादी रूपाचा विरोध केला. या परंपरेने हडप्पा मोहेंजोदडो संस्कृतीची स्तुती करत स्वातंत्र्यापूर्वीच्या आदिवासींच्या वारशाचे गौरव करून आर्य लुटारुंचा विरोध केला. भारतात अनेक धर्मनिरपेक्षतावाद्यांनी हिंदुत्ववादाला विरोध करत आपली समतावादी भूमिका स्पष्ट केली व हिंदू धर्मात सुधारणांचा मार्ग प्रशस्त करण्याचा प्रयत्न केला परंतु अशा सुधारणांनी फारसा फरक पडेल असे जातीविरोधी चळवळीच्या लोकांना वाटत नव्हते. या पार्श्वभूमीवर गेल लिहितात की, "धर्मनिरपेक्षतावाद्यांनी हिंदू धर्माचा

विरोध करूनही दलित वंचितांनी मुळात रूपांतरित गैरहिंदू ओळखीच्या राजकारणाची घोषणा केली आणि सुधारणावादी हिंदू ओळखीच्या विरोधात त्यांनी स्वतः हिंदू धर्माला शोषक वर्ग, जात आणि पितृसत्ताक शक्तीच्या रूपात परिभाषित केले.” १२

या पुस्तकात लेखिकेने दलित राजकारण आणि दलित दृष्टिकोनासाठी दलित शब्दाच्या पुढे जाण्याची गरज व्यक्त करून हा शब्द सामाजिक उतरंडीमध्ये सर्वात शोषित आणि वंचित वर्गाचा कसा प्रतीक बनला आहे हे नमूद केलेले आहे. पुस्तकात हिंदू वादाच्या प्रभुत्व सोबत बौद्ध धर्म आणि रूढीवादी भक्तीच्या रूपात प्रतिरोध आणि विद्रोहाच्या आक्रमक प्रवृत्तीचेही वर्णन केलेले आहे, हे प्रतिरोध प्रारंभी स्त्रीवादींद्वारे पितृसत्तेच्या विरोधात उमटले तर पुढे दलित कार्यकर्त्यांच्या विद्रोहाच्या व्यापक रूपात फुले, पेरियार, रमाबाई, ताराबाई यांच्यापासून तर कबीर, तुकाराम, आंबेडकर आणि महात्मा बुद्धापर्यंत हे विरोधाचे स्वर दिसून येतात. या पुस्तकात हिंदूवाद आणि त्याची जातीगत विचारधारा व त्याच्या शोषणाच्या रूपाला नष्ट करून नवीन मार्ग निर्माण करणाऱ्या विविध प्रयत्नांच्या यश आणि अपयशाची चर्चा केलेली आहे. यात दलित राजकारणाच्या तर्काचा विचार करून हिंदूवादाला पर्याय म्हणून बहुजन समाज पार्टीच्या उदयाचा लेखाजोखाही घेतला आहे.

‘भारतातील बौद्धधर्म : ब्राह्मणीधर्म व जातीयतेला आव्हान’ हे गेल ऑम्वेट यांचे महत्त्वाचे पुस्तक आहे. भारतातील बौद्ध धर्म व ब्राह्मणी धर्म आणि जात यांच्या २५०० वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीचा विशेष अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे बौद्ध धम्माचे आकलन या प्रयत्नांचा आरंभबिंदू आहे बौद्ध धर्माचे ऐतिहासिक सामाजिक राजकीय आणि तात्विक पैलू पुढे आणण्यासाठी गेल ऑम्वेट यांनी बौद्ध साहित्याची मूळ स्त्रोत आणि उपलब्ध नवीन साहित्य या दोन्हींचे संशोधन केले आहे या प्रक्रियेत त्यांनी वर्तमान दृष्ट्या आस्थेच्या अशा अनेक महत्त्वाच्या विषयांची चर्चा केली आहे. डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराद्वारे तिहेरी आव्हान उभे केले होते पहिले आव्हान ब्राह्मणी परंपरेला होते जी पारंपारिक भारतीय समाजातील प्रमुख शोषण कार्य व्यवस्था होती दुसरे आव्हान मार्क्सवादाला होते जी शोषणाविरुद्ध उभी राहणारी एक प्रमुख विचारधारा होती आणि तिसरे आव्हान खुद्द बौद्ध धम्माच्या प्रचलित स्पष्टीकरणांना होते.१३ आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेणे हे ऐतिहासिक दृष्ट्या क्रांतिकारक घटना होती. आंबेडकरांना ब्राह्मणी धर्माच्या आणि जातीयतेच्या शोषणावर पर्याय होता त्यांनी प्रचलित अनेक धर्मांची चाचपणी केली त्यांना बौद्ध धम्म हा योग्य मार्ग वाटला. बौद्ध धम्मात महायान हीनयान आणि वज्रयान असे प्रमुख पंथ दिसून येतात. आंबेडकरांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यानंतर त्यांनी कुठल्याही पंथाचा स्वीकार केला नाही पण ही एक नवीन आणि वेगळी सुरुवात असल्याने अभ्यासकांनी आंबेडकरांच्या मार्गाला 'नवयान' असे संबोधले. गेल सुद्धा लिहितात की “आंबेडकरांनी याहून वेगळ्या अशा नवयानाची घोषणा केली नवयान ही संज्ञा पुढे मोठ्या प्रमाणात स्वीकारली गेली. पुढील काळात नवयानाचे वेगळेपण अतिशय बारकाईने स्पष्ट केले गेले.” १४

आंबेडकरांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यानंतर सर्वदूर त्याची चर्चा झाली त्यांनी केवळ बौद्ध धम्माचा स्वीकार केला नव्हता तर बौद्ध धम्माचे नव्याने अर्थनिर्णयनही केले होते. धम्मदिक्षेसोबत त्यांनी विचारपूर्वक २२ प्रतिज्ञाही जोडल्या होत्या या प्रतिज्ञा आंबेडकर पुरस्कृत बौद्ध धम्माचा एक महत्त्वाचा भाग बनल्यात व त्या धर्मांतरित बौद्धांच्या आचारसंहितेच्या निदर्शक ठरल्यात. आंबेडकरांनी बौद्ध धम्म स्वीकारत असताना जे काळ सुसंगत बदल केले त्यामुळे बौद्ध धर्माच्या मूळ वैचारिक पायाला कुठेही धक्का लागला नाही. आंबेडकरांनी नवदीक्षित बौद्धांना धम्म समजावून सांगणारे सोपे पण परिपूर्ण असे पुस्तक द्यायचे होते त्यामुळे त्यांनी बौद्ध धम्म शास्त्राच्या पुनर्लेखनाचे

आव्हानात्मक कार्य हाती घेतले व त्यातून 'बुद्ध आणि त्याचा धम्म' हा ग्रंथराज साकारला. गेल म्हणतात त्याप्रमाणे "आंबेडकरांकरिता बौद्ध धम्म म्हणजे फक्त आध्यात्मिकता नव्हती तो त्यांच्याकरिता एक तर्कसंगत मानसशास्त्रीय दिशा असलेला 'धम्म' (शिकवण) होता."[१५] आंबेडकरांनी सिद्धार्थच्या परिव्रज्येची पारंपारिक कथा नाकारली. तसेच चार आर्य सत्ये हे बुद्धाच्या मूळ शिकवणुकीचा भाग नाही असा त्यांचा दावा होता. कर्म आणि पुनर्जन्माची शिकवण आणि बुद्धाने आत्म्याच्या अस्तित्वाला दिलेला नकार यात भयंकर विसंगती आहेत असे त्यांचे म्हणणे होते. भिक्खू जर समाजसेवक असेल तरच तो बौद्ध धम्माची आशा होऊ शकतो असे त्यांना वाटत होते. कर्माची संकल्पना स्वीकारणे म्हणजे मागच्या जन्मातील पापांमुळे आपण अस्पृश्य झालो हे मान्य करणे होय असे त्यांना वाटते त्यामुळे आंबेडकर ही संकल्पना नाकारतात. आंबेडकरांची ही मते एकीकडे निश्चितच विचार प्रवृत्त करणारी होती तर दुसरीकडे पारंपारिक बौद्ध धम्माला आव्हान देणारीही होती.

'दलित दृष्टी' हे अजून एक गेल ऑम्वेट यांचे महत्वाचे पुस्तक आहे. या पुस्तकातून प्रामुख्याने त्यांनी हिंदू धर्म आणि हिंदू धर्माची संरचना व त्याविरुद्ध त्याविरुद्ध झालेली आंदोलने विशेषत: दलित व इतर सामाजिक आंदोलनांची चर्चा केलेली आहे. शिवाय ब्राह्मणी हिंदू धर्म व हिंदुत्ववादी मानसिकता यांच्या उदारवादी स्वरूपात भारतीय समाज आणि इतिहासाची वर्चस्ववादी व्याख्या करण्यात आलेली आहे त्याच्याशी दोन हात कसे केले याचे विश्लेषण करण्यात आले आहे. दलित चळवळी व अन्य जातीविरोधी चळवळींनी ब्राह्मणी हिंदू धर्मापुढे आव्हान निर्माण करत शोषणाचे तंत्र उघड केले व व्यवस्थेला प्रश्न विचारत त्यावर घनाघाती हल्ले केले. यामध्ये महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, पेरियार यांचा प्रामुख्याने सहभाग होता. या सर्वांनी ब्राह्मणी हिंदू धर्माचे परखड असे परीक्षण केले त्याची वर्चस्ववादाची भूमिका लोकांपुढे मांडण्याचे काम केले. गेल यांच्यामते, "भारतीय संस्कृती ब्राह्मणवादी वर्चस्व लादनारी हिंदुत्वाची निर्मिती आहे. या संघर्ष आणि लढाईचा इतिहास तेवढाच दीर्घ आहे जेवढा की हिंदुत्व लादनाऱ्या प्रयत्नांचा आहे."[१६] भारतात राष्ट्रवादी चळवळ, दलित चळवळ, जातीअंताची चळवळ व मार्क्सवादी चळवळीचा कालखंड एकच आहे या सर्व चळवळींमध्ये परस्पर अंतर्गत विरोध दिसून येतो परंतु राष्ट्रवादी चळवळ वगळता सामाजिक विषमतेच्या विरुद्ध लढले पाहिजे यावर इतरांचे एकमत होते. दलित चळवळ व जातीअंताच्या चळवळीच्या नेत्यांनी ब्राह्मणी वर्चस्व, जातीव्यवस्था यांना स्पष्टपणे विरोध केलेला आढळतो व त्या प्रकारचे त्यांनी लिखाणही केलेले आहे. तत्कालीन मार्क्सवादी चळवळीमध्ये सामाजिक विषमतेच्या विरोधात स्वर तर उमटतात परंतु ते जाती ऐवजी वर्गाभोवती अधिक फिरताना दिसतात शिवाय धार्मिक व सांस्कृतिक वर्चस्वाच्या भूमिकेवर त्यांची स्पष्ट अशी भूमिका दिसून येत नाही. त्यामुळेच गेल सुद्धा लिहितात की, "भारतीय साम्यवाद्यांनी सांस्कृतिक व प्रतीकात्मक मुद्द्यांवर पूर्णपणे लक्ष दिले नाही त्यामुळेच असे म्हटले जाऊ शकते की त्यांनी भारतीय संस्कृतीतील ब्राह्मणवादाच्या वर्चस्ववादी अर्थ आणि स्वरूपाकडे दुर्लक्ष केले."[१७] गेल यांनी त्यांचे कुठलेही पुस्तक असो आपली मते अगदी स्पष्ट मांडली आहेत. हजारो वर्षांपासून विषमतावादी व समतावादी विचारांमध्ये संघर्ष सुरु आहे त्यात दोन्ही बाजूंनी डावपेच आखले जातात व त्याद्वारे संघर्ष केला जातो बरेचदा हा संघर्ष राजकीय व आर्थिक स्वरूपाचा असतो पण त्यात अन्य बाजूंवर विशेष लक्ष दिले जात नाही त्यावर आपले मत नोंदवतांना गेल लिहितात, "हे युद्ध केवळ राजकीय व आर्थिक स्तरावर नाही तर सांस्कृतिक व प्रतिकांच्या स्तरावरही लढले गेले पाहिजे, या युद्धाला केवळ धर्मनिरपेक्षताच्या अस्त्राने नव्हे तर भारतीय इतिहास व ओळख निर्मितीच्या प्रत्येक टप्प्यावर लढले गेले पाहिजे ज्यावर हिंदू राष्ट्रवाद्यांनी आपला हक्क सांगितला आहे."[१८] गेल यांचे हे विधान म्हणजे जातीअंताच्या

चळवळीत काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी दिशादर्शक आहे.

गेल यांनी आंबेडकरांचे 'आंबेडकर प्रबुद्ध भारताच्या दिशेने' या शीर्षकाने एक लघु चरित्र लिहिलेले असून त्याद्वारे भारतातील सर्वात गरीब, अस्पृश्य व पददलित वर्गात जन्मलेला व्यक्ती स्वतंत्र भारताचा निर्माता आणि नव्या शतकातील नव्या मुक्ती आंदोलनाचा प्रणेता कसा बनला हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. आंबेडकर म्हटले की दोन तीन बाबी प्रामुख्याने आठवतात पहिली म्हणजे आंबेडकर व संविधान दुसरी म्हणजे आंबेडकरांचे पुतळे व तिसरी म्हणजे आंबेडकर जयंती व निळे झेंडे. आजच्या काळात या बाबी आंबेडकरी चळवळीची ओळख बनल्या आहेत. यातही आंबेडकरांचे पुतळे विशेष रूपाने लक्ष वेधून घेतात, हे पुतळे दलित-शोषित-वंचितांसाठी प्रेरणास्त्रोत ठरले आहेत. भारतात आज सर्वाधिक पुतळे कुणाचे असतील तर ते आंबेडकरांचे असावेत असे वाटते. या पुतळ्यांना राजकीयदृष्ट्या महत्त्व प्राप्त झाले आहे. गेल लिहितात, "एक बाब स्पष्ट आहे की, झेंडे व पुतळ्यांच्या राजकारणाने दलितांनी आंबेडकरांना प्रामुख्याने जगापुढे आणले आहे."[१९] आंबेडकर केवळ दलितांचे नेते होते असा सार्वत्रिक समज मोठ्या प्रमाणात करून देण्यात आला आहे व हा समज एक मोठा गैरसमज म्हणून आजही टिकून असलेला दिसतो. बहुतांश लेखकांनी त्यातही उच्चवर्णीय लेखकांनी आंबेडकरांची तशीच प्रतिमा त्यांच्या लेखनातून व पुस्तकांतून निर्माण केली आहे. गेल यावर आक्षेप नोंदवत लिहितात की, "त्यांच्या हातातील संविधान या बाबीचे निदर्शक आहे की आंबेडकर केवळ दलित व सर्व शोषित-पिडीत जातींचे नेते नव्हते तर ते एक राष्ट्रीय नेते होते, ते त्या अभिजन राष्ट्रवादी नेत्यांपेक्षा वेगळे होते ज्यांनी वसाहतिक सत्तेच्या विरोधात संघर्ष केला होता."[२०] गेल यांनी तत्कालीन राष्ट्रीय नेत्यांपेक्षा आंबेडकरांना वेगळे दाखवत त्यांनी नव्या भारताच्या निर्मितीसाठी कसे महत्त्वपूर्ण योगदान दिले याचे दाखले दिले आहेत. आंबेडकरांचा राष्ट्रवाद केवळ राजकीय स्वातंत्र्याची ग्वाही देणारा नव्हता तर त्यात राष्ट्र निर्मिती, सामाजिक समता व युगांपासून जाती व वर्णव्यवस्थेचा शिकार असलेल्या समाजात एकता निर्माण करणारा होता. त्यामुळे तत्कालीन राष्ट्रीय नेत्यांमध्ये आंबेडकर हे वेगळे उठून दिसणारे नेते होते यात संशय नाही.

**निष्कर्ष**

- गेल यांचे लिखाण व्यवस्था बदलाचे, परिवर्तनाचे लिखाण असून त्यांच्या लेखनातून त्यांचा फुले-आंबेडकरवादी व मार्क्सवादी दृष्टीकोन दिसून येतो.
- गेल यांनी राष्ट्रवादी, ब्राह्मणवादी, हिंदुत्त्ववादी व वर्चस्ववादी विचारांचा आढावा घेत समतावादी चळवळींनी त्यांना कश्याप्रकारे आव्हान दिले त्यावर चिकित्सक भाष्य केले आहे.
- गेल यांनी समतावादी व जातीअंताच्या चळवळी या कश्याप्रकारे लोकशाहीवादी होत्या हे ठामपणे सांगून या चळवळी अंतिमतः कशा राष्ट्रवादी होत्या हे निक्षून सांगितले आहे.
- गेल यांनी त्यांच्या लेखनातून आंबेडकरवाद, गांधीवाद, मार्क्सवाद, बौद्ध धम्म यावर भाष्य करून त्याची सांगोपांग चर्चा केलेली आहे.
- गेल यांनी दक्षिण भारतातील सामाजिक परिवर्तनाच्या चळवळींचा मागोवा घेतला असून त्याद्वारे पेरियार व इतरांच्या कर्तृत्त्वाची दखल घेतली आहे.
- गेल यांनी प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देण्यासाठी नवे पद्धतीशास्त्र विकसित करण्याची गरज व्यक्त केली असून बव्हंशी त्याची पूर्तता त्यांनी स्वतःच्याच लेखनातून केलेली दिसते.

## संदर्भ


१. गेल ऑम्वेट, 'ह्यो तुरुंग फोडायचा हाय गं' (अनुवाद प्रमोद मुजुमदार) मधुश्री पब्लिकेशन, पुणे, २०२२, पृष्ठ ११

२. कुंदा प्रमिला निळकंठ, 'गेल ऑम्वेट वैचारिक आधार', थिंक महाराष्ट्र, २० ऑक्टोबर २०२१ https://www.thinkmaharashtra.com/गेल-ऑम्वेट-वैचारिक-आधार-gail-omvedt/ (संकेतस्थळाला भेट १६ ऑक्टोबर २०२२)

३. पवार दया, 'क्रांतिबाची लेक', महाराष्ट्र टाइम्स, २९ ऑगस्ट २०२१ https://maharashtratimes.com/editorial/samwad/researcher-author-dr-gail-omvet/articleshow/85729802.cms (संकेतस्थळाला भेट १६ ऑक्टोबर २०२२)

४. गेल ऑम्वेट, 'बेगमपुराच्या शोधात : जातीविरोधी विचारवंतांची सामाजिक दृष्टी' (अनुवाद प्रमोद मुजुमदार) मधुश्री पब्लिकेशन, पुणे, २०२२, पृष्ठ. १२

५. तत्रैव, पृष्ठ ३३७

६. गेल ऑम्वेट, 'दलित और प्रजातांत्रिक क्रांती : उपनिवेशीय भारत मे डॉक्टर आंबेडकर एवं दलित आंदोलन', सेज पब्लिकेशन, नई दिल्ली, द्वितीय आवृत्ती, २०१७, पृष्ठ २

७. तत्रैव, पृष्ठ ६

८. तत्रैव, पृष्ठ ५

९. तत्रैव, पृष्ठ ८

१०. गेल ऑम्वेट, 'जाति की समझ : महात्मा बुद्ध से बाबासाहेब अम्बेडकर और उनके बाद' (अनुवाद नलिनी बंसल) ओरियंट ब्लैकस्वान प्राइवेट लिमिटेड हैदराबाद, २०१८, पुस्तक परिचय पृष्ठ x

११. तत्रैव, पृष्ठ xi

१२. तत्रैव

१३. गेल ऑम्वेट, 'भारतातील बौद्धधर्म : ब्राह्मणीधर्म व जातीयतेला आव्हाने', सेज पब्लिकेशन, नवी दिल्ली, २०१६, पृष्ठ १

१४. तत्रैव, पृष्ठ २

१५. तत्रैव, पृष्ठ ४

१६.गेल ऑम्वेट, 'दलित दृष्टी' (अनुवाद रमणिका गुप्ता आणि अकिल कैस) वाणी प्रकाशन नवी दिल्ली, २०१७, पुस्तकाच्या प्रस्तावनेतील लेखिकेची नोंद

१७. तत्रैव

१८. तत्रैव

१९. गेल ऑम्वेट, 'अंबेडकर प्रबुद्ध भारत की ओर' (अनुवाद डॉ. पूरनचंद टंडन) पेंगुइन रैंडम हाउस इंडिया प्रा. लि., गुडगांव, हरियाणा, प्रस्तावना, पृष्ठ xiii

२०. तत्रैव, प्रस्तावना, पृष्ठ xiii-xiv